विशेष

# सेंद्रिय शेतीचे प्रमाणीकरण; आवश्यकता आणि प्रक्रिया

**डॉ. विनायक शिंदे-पाटील**
सहायक प्राध्यापक,
कृषी महाविद्यालय,
विळद घाट, अहमदनगर



सर्वसाधारणपणे सेंद्रिय अन्नाच्या उत्पादनाशी थेट संबंध असलेल्या कोणत्याही व्यवसायाला म्हणजेच बियाण्यांचे पुरवठादार, शेतकरी, अन्न प्रक्रियादार, रिटेलर्स आदींना प्रमाणीकरणाचे प्रमाणपत्र मिळू शकते. प्रत्येक देशानुसार त्यासाठी असलेल्या आवश्यकतेप्रमाणे  बदल होतो. सर्वसाधारणतः त्यामध्ये पिकविणे, साठविणे, प्रक्रिया, पॅकेजिंग आणि वाहतूक इत्यादींबाबतच्या उत्पादन मानकांचा समावेश असतो.

सेंद्रिय शेती सुमारे ११० देशांमध्ये केली जात असून, शेतजमिनीतील तिचा हिस्सा वाढतो आहे. सेंद्रिय उत्पादनांची निर्मिती करणारे आशियातील प्रमुख देश आहेत चीन, युक्रेन, भारत, इंडोनेशिया आणि इस्त्राईल. या देशांमध्ये प्रामुख्याने सेंद्रिय शेती केली जाते. युनायटेड स्टेटस, जर्मनी, फ्रान्स, इटली, बेल्जियम, युनायटेड किंग्डम आणि जपान या सेंद्रिय अन्नाच्या उत्पादनासाठी मुख्य बाजारपेठा आहेत. सेंद्रिय बाजारपेठ स्थिर गतीने वाढत असताना त्यासंबधी सेंद्रिय प्रमाणीकरण (सर्टिफिकेशन) आणि नियमावली अधिकाधिक कठोर आणि अनिवार्य होत आहे.

सर्वसाधारणपणे सेंद्रिय अन्नाच्या उत्पादनाशी थेट संबंध असलेल्या कोणत्याही व्यवसायाला म्हणजेच बियाण्यांचे पुरवठादार, शेतकरी, अन्न प्रक्रियादार, रिटेलर्स आदींना प्रमाणीकरणाचे प्रमाणपत्र मिळू शकते. प्रत्येक देशानुसार



त्यासाठी असलेल्या आवश्यकतेप्रमाणे बदल होतो. सर्वसाधारणतः त्यामध्ये पिकविणे, साठविणे, प्रक्रिया, पॅकेजिंग आणि वाहतूक इत्यादींबाबतच्या उत्पादन मानकांचा समावेश असतो. त्याचे उद्देश पुढीलप्रमाणे आहेत.

* कृत्रिम रासायनिक निविष्ठा (उदा. रासायनिक खते, कीटकनाशके, प्रतिजैविके, अन्नपुरके वगैरे) आणि जनुकीयदृष्ट्या बदल केलेले सजीव टाळणे.

* जी जमीन रसायनांपासून अनेक वर्षे (बहुधा तीन) मुक्त आहे, अशा जमिनीच्या वापर- उत्पादनाच्या आणि विक्रीच्या तपशिलवार नोंदी ठेवणे.

* सेंद्रिय उत्पादने अप्रमाणित उत्पादनांपासून काटेकोरपणे वेगळी ठेवणे.

* ठराविक कालावधीने उत्पादनाच्या जागेवरच तपासणी करवून घेणे.

**प्रमाणीकरणाचा उद्देश** : जगभरात सेंद्रिय अन्नाला असलेल्या वाढत्या मागणीमुळे प्रमाणपत्रीकरणाची आवश्यकता भासत असून, सेंद्रिय व्यापारातील गुणवत्ता आश्वासित करण्यासाठी फसवणूक टाळणे हा त्यामागील हेतू आहे. ग्राहकांसाठी प्रमाणित- सेंद्रिय हा शिक्का उत्पादनाच्या दर्जाची खात्री देतो. प्रमाणपत्रीकरण हे वस्तुतः एक विपणन साधन असून, त्याचा उद्देश सेंद्रिय उत्पादनाची विक्री ग्राहकांना करणे सुलभ आणि नियमित व्हावे असा आहे.

**प्रमाणपत्रीकरण प्रक्रिया** : एखादे शेत प्रमाणित करुन घेण्यासाठी शेतकऱ्याला शेतीच्या नेहमीच्या कामाव्यतिरिक्त इतर अनेक कामे करावी लागतात.

सेंद्रिय मानकांचा अभ्यास करावा लागतो. ज्यामध्ये शेतमालाची साठवण, वाहतूक आणि विक्री अशा शेतीच्या प्रत्येक बाबतीत आवश्यकतांचा तपशिलाने समावेश असतो.

**अनुपालन** : शेतावरील सुविधा आणि उत्पादनाच्या पध्दतींनी मानकांचे अनुपालन करणे आवश्यक असते. ज्यामध्ये सुविधांमध्ये बदल करणे, स्त्रोतामध्ये आणि पुरवठादारामध्ये बदल करणे वगैरे आवश्यक ठरु शकते.

**लेख प्रविष्ट करणे** : व्यापक कागदोपत्री व्यवहार करावा लागतो. शेताच्या इतिहासाचा तपशील, सध्याचा तपशील आणि बहुदा मातीच्या व पाण्याच्या चाचण्यांचे निष्कर्ष नोंदवावे लागतात.

**नियोजन** : लेखी वार्षिक उत्पादन योजना सादर करावी लागते. त्यामध्ये बियाण्यांपासून विक्रीपर्यंत सर्व तपशील द्यावा लागतो. बियाण्यांचे स्त्रोत, शेताचे आणि पिकांचे स्थान, खते, आणि कीटकनाशके, कापणीच्या पध्दती, साठवणाचे स्थान वगैरे.

**तपासणी** : शेतातील वार्षिक तपासण्या प्रमाणपत्र देणाऱ्याकडून केल्या जातात. त्यामध्ये प्रत्यक्ष दौरा, नोंदीची तपासणी आणि तोंडी मुलाखत यांचा समावेश असतो.

**शुल्क** : वार्षिक तपासणीसाठी/ प्रमाणपत्रासाठी शुल्क आकारण्यात येते ते वेगवेगळ्या देशांमध्ये वेगवेगळे असतो.

**नोंदी ठेवणे** : कोणत्याही वेळी सर्व कामाची नोंद करणाऱ्या लेखी, दैनंदिन कृषी आणि विपणन नोंदी तपासणीसाठी उपलब्ध असणे आवश्यक आहे.

याव्यतिरिक्त थोडीशी पूर्वसूचना देऊन किंवा न देताही तपासण्या केल्या जातात आणि ठराविक चाचण्या (उदा. जमिनीच्या पाण्याच्या किंवा रोपाच्या उतीच्या) घेतल्या जातात. पहिल्यांदा शेताला प्रमाणपत्र देताना जमीन निविष्ठा पदार्थांपासून (कृत्रिम रसायने) काही ठराविक वर्षे मुक्त असणे ही प्राथमिक गरज असते. बहुदा तीन वर्षांच्या या कालावधीसाठी, पारंपरिक शेताने सेंद्रिय मानकांचे पालन करणे अत्यावश्यक असते याला संक्रमण काल असे म्हणतात. संक्रमण कालातील पिकांना पूर्णतः सेंद्रिय समजले जात नाही. ज्या शेतात अगोदरपासूनच रसायनांशिवाय पिके घेतली जातात त्याला सामान्यतः विनाविलंब प्रमाणपत्र मिळते.

शेतीव्यतिरिक्त इतर परिचालनासाठीही प्रमाणपत्र अशाच रितीने देण्यात येते. तेथे घटकद्रव्यांवर आणि इतर निविष्ठांवर तसेच प्रक्रियेच्या हाताळणीच्या स्थितीवर भर दिला जातो.



**प्रमाणीकरणाचे महत्त्व** : कुठल्याही शेतीमालाची उत्पादकता ही त्या शेतीमालाच्या बाजारभावावर जास्त अवलंबून असते. सेंद्रिय शेतीमालासाठीही हे तत्त्व लागू पडते. सेंद्रिय शेतीमालाला जर चांगली बाजारपेठ उपलब्ध झाली, तर सेंद्रिय माल पिकविण्याकडे शेतकऱ्यांचा कल नक्कीच वाढलेला दिसेल, यात शंका नाही. शेतीमालाच्या विक्रीचा विचार आपण केला, तर तो सामान्य ग्राहकाच्या कसा पसंतीस उतरेल याचा विचार केला पाहिजे. आपण जर ग्राहकाच्या भूमिकेतून पाहिले, तर सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे तो शेतीमाल हा आरोग्यवर्धक असेल का? आज रासायनिक खते, कीटकनाशके, संजीवके यांचा वापर करून माल पिकवला जातो, त्यातून पिकवलेला माल जरी टवटवीत आणि आकर्षक असला, तरी तो रासायनिक अवशेषयुक्त असेल तर कर्करोग, चेतापेशींचे आजार आणि लहान बालकांमधील मतिमंदत्व यासारख्या असाध्य शारीरिक व्याधींना निमंत्रण देणारा असतो.

सेंद्रिय शेतीत कोणत्या निविष्ठा वापरायच्या, त्या पिकाची मशागत कशी करायची, शेतीमाल बाजारात कसा विकायचा, ग्राहकाला त्या सेंद्रिय शेतीमालाची विश्वसनीयता कशी पटवून द्यायची? असे अनेक प्रश्न सेंद्रिय शेती उत्पादकाला पडतात. या प्रश्नांची उत्तरे आपल्याला सेंद्रिय शेतीचे प्रमाणीकरण या माध्यमातूनच मिळतात. हे प्रमाणीकरण सेंद्रिय शेतीमालाच्या उत्पादकापासून ते ग्राहकापर्यंत जी साखळी आहे, त्यातील विश्वसनीय कडी आहे, असे म्हटले तरी ते वावगे ठरणार नाही. गरज आहे ती प्रमाणीकरण पद्धत समजून घेण्याची. कारण प्रमाणीकरण पद्धत 'इंडिया ऑरगॅनिक' नावाच्या लोगोखाली आपल्या सेंद्रिय शेती उत्पादनाच्या राष्ट्रीय कार्यक्रमाद्वारे राबवली जाते.

**जागतिक प्रमाणीकरण संस्था** : प्रथम प्रमाणीकरणाची सुरवात जर्मनी देशात झाली ती १९८० मध्ये. इंटरनॅशनल ऑरगॅनिक ॲग्रीकल्चर मूव्हमेंट नावाची संस्था सर्वप्रथम सेंद्रिय शेतीचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी पुढे सरसावली. त्यांनी सेंद्रिय शेतीची परिभाषा काही ठळक तत्त्वांवर अधोरेखित केली आहे.

१. **आरोग्याचे तत्त्व** : माती, रोपे, पशुपक्षी, मानव आणि पृथ्वीचे आरोग्यवर्धन अविभाज्य व शाश्वत स्वरूपात करायला पाहिजे.

२. **सेंद्रिय शेती** ही जिवंत पर्यावरणीय रचना आणि जीवनचक्रावर अवलंबून असायला हवी.

३. **निष्पक्षतेचे तत्त्व** : ज्यामध्ये सेंद्रिय शेती ही सर्वसामान्य पर्यावरण व जीवनाच्या संधींची निष्पक्षतेने खात्री देणाऱ्या संबंधांवर आधारित असली पाहिजे.

४. **संगोपनाचे तत्त्व** : जेणेकरून सेंद्रिय शेतीचे व्यवस्थापन संरक्षणात्मक आणि जबाबदार स्वरुपात झाले पाहिजे. ज्यायोगे वर्तमान आणि भविष्यकालीन पिढ्यांचे आणि पर्यावरणाचे आरोग्य व कल्याण यांचे संरक्षण होईल.

या संपूर्ण तत्त्वांचा वापर प्रत्यक्षात अवलंबता यावा यादृष्टीने या संस्थेने सर्वप्रथम सेंद्रिय शेतीची मानके शास्त्रीयदृष्ट्या जगापुढे मांडली. पुढे याच तत्त्वांचा आधार घेऊन प्रत्येक देशाने आपले राष्ट्रीय सेंद्रिय शेतीचे कार्यक्रम आखले. तेथील शेतीसाठी असणारी भौगोलिक परिस्थिती व वातावरणानुसार सेंद्रिय शेतीची मानके तयार केली.

बहुतेक देशांमध्ये सेंद्रिय मानके शासनामार्फत तयार करण्यात येतात आणि शासनाची त्यांच्यावर देखरेखही असते. युनायटेड स्टेटस, युरोपियन युनियन आणि जपान या तीन प्रमुख सेंद्रिय बाजारपेठांमध्ये सेंद्रिय कायदे समावेशक स्वरुपाचे आहेत आणि सेंद्रिय ही संज्ञा वापरण्याची मुभा फक्त प्रमाणित उत्पादकांनाच आहे. सेंद्रिय कायदे नसलेल्या देशांमध्ये शासकीय मार्गदर्शक तत्त्वे अस्तित्वात असतात किंवा नसतातही आणि प्रमाणपत्रीकरणाचे काम गैरव्यापारी संस्था किंवा खाजगी कंपन्या करतात.

प्रमुख देशांतील प्रमाणीकरण यंत्रणा अशा आहेत.

| अ.क्र. | देश | प्रमाणीकरण यंत्रणा / संस्था |
|---|---|---|
| १ | युरोपियन युनियन | इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ ऑरगॅनिक ॲग्रीकल्चर मुव्हमेंटस (FO-M²) |
| २ | युनायटेड किंगडम | युके रजिस्ट्रर ऑफ ऑरगॅनिक फुड स्टॅन्डर्डस (UKROFS) |
| ३ | युएसए | नॅशनल ऑरगॅनिक प्रोग्रॅम (NOP) |
| ४ | जपान | जॅपनीज ॲग्रीकल्चर स्टॅन्डर्डस (JAS) |
| ५ | ऑस्ट्रेलिया | ऑस्ट्रेलिया क्वारंटाईन अॅन्ड इन्स्पेक्शन सर्व्हिस (AQIS) |
| ६ | भारत | नॅशनल प्रोग्रॅम फॉर ऑरगॅनिक प्रॉडक्शन (NPOP) |

आयएफओएमच्या सेंद्रिय शेतीच्या मानांकनांच्या आधारेच आपल्या देशात १ ऑक्टोबर २००१ रोजी सेंद्रिय उत्पादनाचा राष्ट्रीय कार्यक्रम (एनपीओपी – National Programme for Organic Production) सुरू करण्यात आला. अन्य देशांप्रमाणे आपल्या देशातही प्रमाणित सेंद्रिय शेती कशी करावी, यासाठी मानके तयार करण्यात आली.

आपल्या देशाची एनपीओपी मानके युरोपीय देशांच्या संघटनेच्या शेतीच्या मानकांशी तुलनात्मकरित्या संयुक्तिक आहेत, तसेच अमेरिकेच्या (NOP - National Organic Programme) राष्ट्रीय मानकांनुसार सुसंगत मान्यताप्राप्त आहेत. अपेडा या संस्थेमार्फत या सेंद्रिय शेतीच्या राष्ट्रीय कार्यक्रमाचे कामकाज चालते.

या संस्थेला संलग्न अशी राष्ट्रीय मान्यता मंडळ (NAB - National Accreditation Board) संस्थेची स्थापना करण्यात आली आहे. या संस्थेच्या नियंत्रणाखाली २२ प्रमाणीकरण संस्था कार्य करतात. तसेच या प्रमाणीकरण संस्थांनी पाठविलेल्या शेतमालाच्या नमुने परीक्षणासाठी राष्ट्रीय मान्यता मंडळ मान्यताप्राप्त ३३ प्रयोगशाळा कार्यरत आहेत.

भारतामध्ये शासनाने खालील सहा संस्था प्रमाणपत्रीकरण संस्था म्हणून अधिस्विकृत करण्यासाठी नेमस्त केलेल्या आहेत :

१. अपेडा
२. टी बोर्ड
३. स्पायसेस बोर्ड
४. कॉफी बोर्ड
५. कोकोनट डेव्हलपमेंट बोर्ड
६. डायरेक्टोरेट ऑफ कॅश्यू ॲण्ड कोको

सेंद्रिय शेतीमालाला असलेली निर्यात बाजारपेठ ही भारतातील सेंद्रिय शेतीची मुख्य प्रेरणा आहे. भारतातून ३१ सेंद्रिय उत्पादने निर्यात होतात.

भारत सेंद्रिय चहाचा निर्यातदार म्हणून प्रसिध्द आहे. सेंद्रिय भात, भाज्या, कॉफी, तेलबिया, गहू आणि कडधान्ये यांनाही चांगला प्रतिसाद आहे. फळाच्या पिकांपैकी केळी, आंबा आणि संत्री ही सर्वाधिक पसंतीची सेंद्रिय उत्पादने आहेत.

**भारतातील सेंद्रिय उत्पादनांची टक्केवारी**

| | | | |
|---|---|---|---|
| चहा | २४ टक्के | मसाले | ५ टक्के |
| भात | २४ टक्के | कॉफी | ४ टक्के |
| फळे व भाजीपाला | १७ टक्के | | |
| कडधान्ये | ३ टक्के | | |
| गहू | १० टक्के | काजू | ३ टक्के |
| कापूस | ८ टक्के | | |
| इतर | २ टक्के | | |

भारतामध्ये सेंद्रिय माल प्रमाणपत्रीकरण करण्यासाठी NPOP अंतर्गत ११ संस्था अधिस्वीकृती प्रमाणीकरणाचे काम करतात त्यामध्ये महाराष्ट्रातील ४ संस्थांचा समावेश आहे

1. BVQI (INDIA) PVT. LTD., MUMBAI 2. ECOCERT SA (INDIA BRANCH), AURANGABAD 3. INTERNATIONAL RESOURCES FOR FARMER TRADE, MUMBAI 4. NATIONAL ORGANIC CERTIFICATION ASSOCIATION (NOCA), PUNE.

सेंद्रिय प्रमाणपत्रीकरणाबाबतची सविस्तर माहिती अपेडाच्या (www.apeda.com) वर उपलब्ध आहे.